'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 69 : Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October-2018

# सातवाहनकालीन बौद्ध लेणी - स्त्रियांचे योगदान

डॉ. माधवी खरात
मराठी विभाग,
श्री. शाहू मंदिर महाविद्यालय,
पर्वती, पुणे ४११००९.
madhavidkharat@gmail.com
९८८१५४६८८४

## प्रस्तावना

भारतीय स्थापत्य व शिल्पकलेचे अवशेष हे अगदी प्राचीन काळापासूनच म्हणजेच सिंधू संस्कृतीच्या काळापासून (इ.स. पू. २९००) उपलब्ध होतात. पुढे अर्थातच मुसलमानी साम्राज्याच्या अंतापर्यंत (इ. स. १७५०) भारतीय स्थापत्यकलेची परंपरा दिसून येते. सिंधू संस्कृती - वैदिक संस्कृती, ब्राह्मणी काळ, बौद्ध काळ, वैदिक काळ अशा काळाच्या टप्प्यात अनेक राजवटी राज्य करीत असताना, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात त्या त्या राजवटींनी महत्त्वपूर्ण कार्य केलेले आढळते. इ.स. पूर्व ५०० च्या कालखंडात बौद्ध धर्माचा उदय आणि पुढे बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार वेगाने झाला. मौर्य घराण्यातील राजा अशोकाने बौद्ध धर्माचा प्रचार करताना ८२,००० शिलालेख, ताम्रपट कोरले. लेण्यांची निर्मिती करून भारतातच नव्हे तर भारताबहेर हा धर्म प्रसारित केला. भारतीय स्थापत्यशास्त्रात मंदिरे, लेण्या यांचे स्थान महत्त्वूपर्ण आहे. त्यातही लेण्यांमध्ये बौद्ध लेणी, विहारे, स्तूप, चैत्य यांना विशेष महत्त्व आहे. इ.स. पूर्व १ल्या शतकातच महाराष्ट्रात कार्ले येथे लेणी कोरल्याची नोंद आहे. पुढे शृंग, सातवाहन, गुप्त, वाकाटक, चालूक्य, राष्ट्रकूट इत्यादी घराणे महाराष्ट्रात राज्य करीत असताना बौद्ध धर्माच्या लेण्यांचे महत्त्व अबाधितच राहिल. तत्कालीन राजे, अमात्य, राजकीय अधिकारी, श्रीमंत व्यापारी, श्रेष्ठी, सधन नागरिक, स्त्रिया, भिक्षूणी, राजमाता, पत्नी अशा समाजातील सर्व थरातील मंडळींनी लेण्यांना आर्थिक मदत केलेली आढळते. प्रस्तुत लेख ''सातवाहनकालीन बौद्ध लेणी - स्त्रियांचे योगदान'' असा असल्याने इ. स. पूर्व २३० ते इ. स. २२० असा सातवाहनकालीन बौद्ध लेण्या व त्यातील स्त्रियांचे योगदान विचारात घेतले आहे. एकूण ४५० वर्ष व ३२ सातवाहन राजांनी कारभार केला. महाराणी नागनिका, राजमाता गौतमी बलश्री पासून भिक्षूणी, सर्वसामान्य स्त्रिया यांनी लेण्यांसाठी मोठ्या प्रमाणात दानधर्म केलेला आहे. त्या सर्वांचा विचार प्रस्तुत लेखात केला असून विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. अखेरीस निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

## लेणी -

खडक कोरून केलेली 'गुंफा' असे लेण्यांचे सुरुवातीचे स्वरूप होते. प्राचीन मानव दऱ्याखोऱ्यात गुहेत वावरत होता. कालांतराने गुहेतील खोदकामाला, मानवी बुद्धीचे, तंत्रज्ञान, कौशल्य, कारागिरीचे रूप लाभले. रानावनात, एकांतात राहणारे भिक्खू वर्षाऋतूत ह्या गुंफेचा आश्रय घेत. पुढे पुढे राजकीय आश्रय लाभल्याने ह्या गुंफाना कारागिराच्या छन्नी हातोड्यातून मानवी भावभावना, अध्यात्माचा स्पर्श लाभला व लेण्याची निर्मिती झाली.

सातवाहन काळात वैदिक धर्म अस्तित्वात होता, पण बौद्ध धर्माचा प्रभाव सर्वसामान्यांवर असल्याने सातवाहनांनी व तत्कालीन व्यापाऱ्यांनी लेण्यांना मदत केली. व्यापारी मार्गावरच लेण्या खोदल्यामुळे गुदामांची व्यवस्था झाली व व्यापार भरभराटीचा झाला. त्यातूनच लेण्यांना उर्जितावस्था प्राप्त झाली. महाराष्ट्रात

ISSN : 2348-7143
October-2018

सह्याद्रीचा कातळ लेण्यांच्या निर्मितीला अनुकूल असल्याने सातवाहनांनी महाराष्ट्रभर कार्ले, कान्हेरी, कुडा, बेडसा, नाशिक, अंजिठा, शेलारवाडी, शिवनेरी वगैरे ठिकाणी मोठ्या प्रमाणात लेण्या खोदल्या. लेण्यांचे काळानुसार १) इ.स.पू. २रे शतक ते इ. स. २रे शतक २) इ.स. ५ ते इ.स. ७ वे शतक ३) इ.स. ७ वे शतक ते इ.स. १० वे शतक असे टप्पे पडतात. पैकी पहिलया टप्प्यातील सातवाहन काळातील लेण्यांसाठी स्त्रियांनी केलेला दानधर्म, स्तूप, विहार, चैत्याची उभारणी, शिल्पपट्टीका, वेदिका स्तंभ, जलकुंडे, पाण्याचा टाक इत्यादी करीता जाणीवपूर्वक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून लेण्याची पुढील पिढ्यांसाठी जपणूक केलेली आहे. त्यामुळेच तत्कालीन समाजजीवन राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक घटनांचा बोध येतो. संस्कृतीची धरोवर स्पष्ट होत जाते. सातवाहनकालीन बौद्ध लेण्यांच्या निर्मितीतील स्त्रियांचा सहभाग पुढीलप्रमाणे –

**महाराणी नागनिका –**

शृंग घराण्यांवर आक्रमण करून मांडलिक असणाऱ्या सिमूक सातवाहनांनी आपली सत्ता इ.स. पूर्व २२० ला प्रस्थापित केली. त्यामुळे 'सिमूक' हा सातवाहनांचा पहिला मूळ पुरुष मानला जातो. येथील नाणेघाटात या पराक्रमी २३ वर्ष राज्य उपभोगणाऱ्या राजाची त्याचा पुत्र सातकर्णी, त्याची पत्नी नागनिका, तिचे दोन पुत्र व पिता त्रतकयिर यांची प्रतिमा कोरलेली आहे. नागनिका ही सातकर्णी राजाची राणी. अतिशय महत्त्वाकांक्षी व करारी असणाऱ्या नागनिकेने आपल्या पराक्रमी, सहिष्णू पतीसह होमहवन, यज्ञ, उपास, व्रतवैकल्ये करून जनमानसात आदरणीय स्थान प्रस्थापित केले होते. नागनिकेने पतीसह हजारो ब्राह्मणांना गाई, अश्व, धान्याच्या राशी दान दिल्याचा उल्लेख आहे. वैदिक धर्माचे पालन करणारी नागनिका बौद्ध धर्माबाबतही सश्रद्ध होती. तिने अनेक विहारातून तसेच लेण्यांच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पती, पुत्राबाबत अभिमानी असणारी नागनिका आपल्या पित्याविषयी प्रेमळ, अभिमानी होती. नाणेघाटात तिने पती, सासरे, पुत्रांसमवेत पित्याचीही प्रतिमा कोरलेली आढळते. यावरून तिचा दरारा आणि राजकारणातील स्थान लक्षात येते. पित्याची प्रतिमा कोरणारी इतिहासातील कदाचित ती एकमेव स्त्री असावी. तिचा बौद्ध धर्मास होणारा दानधर्म महत्त्वूपर्ण आहे.

**गौतमी बलश्री –**

गौतमीपुत्र सातकर्णी ह्या बलाढ्य, पराक्रमी आणि सश्रद्ध अशा राजाची महामाता. शिवस्वाती सातवाहनाची पत्नी. नाशिकच्या त्रिरश्मी लेणी क्र. ३ जिला देवी लेणी म्हटले जाते ती लेणी गौतमी बलश्रीने कोरलेली आहे. गौतमीपुत्र, सातकर्णीका, शक, क्षत्रप यांना आक्रमणाला सतत तोंड द्यावे लागे. वेळोवेळी नहपान क्षत्रपाशी लढा देऊन गौतमीपुत्राने साम्राज्य वाढविले होते. नाशिकच्या लेण्यात या पुत्राच्या पराक्रमाची मातेने नोंद केलेली आढळते. तिच्या आज्ञेनुसार हा लेख 'लोटा' नावाच्या द्वारपालिकेने लिहून घेतलेला आहे. त्यात तिचा उल्लेख 'जीवसुता' असा म्हणजे 'भाग्यवान स्त्री' असा केलेला आहे. ब्राह्मी लिपित व प्राकृत भाषेत लिहिलेल्या ह्या लेखात करवडी हे गाव बौद्ध भिक्षूंच्या निर्वाहाकरिता दिले होते. ते कसले जात नाही व गावही उद्ध्वस्त झाले हे लक्षात घेता गोवर्धन नगराच्या सीमेंवरील सरकारी शेतातून १०० निवर्तने जमीन या त्रिरश्मी पर्वतातील लेण्यात राहणाऱ्या बौद्ध भिक्षूंना देत असल्याचा उल्लेख आहे. हे लेणे कोरले तेव्हा ते साधेसे होते, पुढे तिचा नातू, वाशिष्टिपुत्र पुळुमाविच्या कारकिर्दीत या लेण्यांवर अलंकरण झाले. यावेळी शिलालेखात "दक्षिणापयेश्वर पुळुमावि याने नाशिक येथे महादेवी बलश्री या आपल्या आजीने कोरलेल्या लेण्यांच्या अलंकरणार्थ आणि पिता गौतमीपुत्र सातकर्णी याच्या पुण्योपार्जनार्थ त्रिरश्मी पर्वताच्या नैर्ऋत्येस असलेले पिसाचीप्रदक गांव सर्व प्रकारच्या उपभोग हक्कांचा त्याग करून तेथील भदावतीय भिक्षूसंघास दान

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 69 : Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October-2018

केले आहे'' असे कोरलेले आहे. हे लेणे पुळुमाविने अलंकरण करून सजविले होते. वेलबुट्टी, नक्षी आणि विविध पशूपक्ष्यांची चित्रे कोरून हे लेणे अतिशय देखणे झालेले होते. या काळात गौतमी बलश्री वयोवृद्ध झाली होती. ८३ वर्षांच्या ह्या राजमातेने लेखात पुत्राच्या पराक्रमाचे, वैभवाचे, सुदृढ शरीरसंपदेचे वर्णन केलेले आढळते. त्यावेळी तिच्या भावना व्याकुळ झालेल्या स्पष्ट जाणवतात. पुत्राचे निधन झाल्याने या स्मृतींना दुःखाची किनार लपलेली आढळते. आपल्या दीर्घ आयुष्यात वैदिक धर्माचे पालन करणारी गौतमी बलश्री, बौद्ध लेण्या, त्यातील चैत्य, विहार इत्यादीबाबत जागृत होती. बौद्ध भिक्षूंना अन्न, वस्त्र (चिवर) औषधपाणी इत्यादीची तिने दखल घेतलेली आढळते. 'अजकालकीय' हे शेत भिक्खू संघाला पुत्राकरवी तिने दान केले होते. गौतमीपुत्र सातवाहनाने नहपानाशी युद्ध करून त्याचा वंशविच्छेद केला व कार्ले लेणीला भेट देऊन तिथल्या बौद्ध संघाला करजक हे गाव दान केले होते. गौतमी बलश्री या मातेच्या सश्रद्ध व संस्कारी वृत्तीमुळेच वैदिक व बौद्ध धर्माला एकत्रित दानधर्म करून सहिष्णू भावना जनमानसात जोपासण्याचे कार्य ह्या मातेमुळेच घडलेले लक्षात येते.

### वासिष्टिपुत्र पुळुमाविची राणी –

वैदिक धर्माचा अभिमानी, वर्णसंकर न मानणारा गौतमीपुत्र सातकर्णीचा पुत्र, वासिष्टपुत्र पुळुमावि याने वर्णसंकर घडवून आणला. राजकीय संघर्षाला पायबंद घालण्यासाठी त्याने उजैनचा महाक्षत्रप कार्दमकवंशीय रुद्रदामन याच्या कन्येशी विवाह केला. ही 'कन्या आपल्या आजेसासूप्रमाणेच दानधर्म व बौद्ध लेण्यास आर्थिक सहाय्य करीत असे. कान्हेरी लेणी ज्याचा उल्लेख गौतमीपुत्र सातकर्णीच्या नाशिक येथील प्रशस्तिलेखात 'कान्हगिरी' असा केलेला आहे. पुढे यज्ञश्रीच्या काळात 'कन्हसेल' असा केला आहे. तर टॉलेमी या प्रवासवर्णनकाराने कल्लिगोरिस असा केला आहे. या कान्हेरी लेणी क्र. ५ च्या टाक्याच्या वर ब्राह्मी लिपीत एक शिलालेख कोरलेला असून त्यात ह्या राणीच्या विश्वासू अमात्याने राणीच्या सांगण्यावरून धर्मादाय म्हणून बौद्ध भिक्षूकांसाठी पाण्याचे टाके कोरल्याचा उल्लेख आहे.

### महाक्षत्रप नहपान कन्या दक्षमित्रा –

सातवाहन आणि क्षत्रप ह्यांचे सतत लढे होत असत. त्यातूनच सातवाहनांच्या दीर्घकालावधीतील राजवटीत क्षत्रप, शकांचे उल्लेख येतात. महाक्षत्रप नहपानाला पुत्र नसल्याने त्याचा राज्यकारभार त्याची कन्या दक्षमित्रा आणि तिचा पती ऋषभदत्त (दिनिकापुत्र) चालवित असत. हे दोघेही धर्मपरायण, श्रद्धाळु आणि परोपकारी होते. कान्हेरी येथील १४ व १५ क्रमांकाच्या लेण्यातील लेखावरून त्यांनी बौद्ध संघासाठी केलेला दानधर्म स्पष्ट होतो. नाशिक, कार्ले, जुन्नर इत्यादी ठिकाणी त्यांचे लेख आहेत. भूमक क्षत्रपानंतर क्षहरात नहपान हा पश्चिम भारताचा क्षत्रप झाला होता. तो इ.स. ९८ ते १२४ वर्षापर्यंत राज्यावर होता. त्याचा जावई ऋषभदत्त व मंत्री आयाम यांनी कोरलेल्या लेखांवरून त्याच्यासंबंधीत माहिती कळते.

### चुटुकुलानंद सातकर्णी कन्या नागमुलनिका –

सातवाहनांचा इतिहास 'पुराणां'मधून उलगडत जातो. त्यात पराक्रमी राजांचा जसा परिचय दिला आहे त्याचप्रमाणे ज्यांचा पराक्रम किंवा माहिती फारशी उपलब्ध नाही त्यांचे केवळ उल्लेख केलेले आहेत. चुटुकुलानंद सातकर्णीचा त्रोटक उल्लेख आढळतो. कान्हेरीच्या ७७ क्रमांकाच्या लेण्यात नागमुलनिष्ठेचा उल्लेख आहे. ही चुटुकुलानंद सातकर्णी महाराजांची कन्या तिच्या पतीचा महाभोजी आणि महारठी असा उल्लेख केलेला आहे; तर स्कंदनाग सातकाची माता आणि महाभोज धनसेन याची भगिनी असा तिचा गौरव केलेला आढळतो. म्हणजेच सातकर्णी घराण्यात ही अत्यंत महत्त्वपूर्ण व प्रतिष्ठित स्त्री होती. तिने आपल्या

ISSN : 2348-7143
October-2018

मातापित्याच्या नावाने हे लेणे भिक्षूसंघाला दान केल्याचा शिलालेख आहे. हा राजा सातवाहनाच्या अखेरच्या काळातील होता.

भिक्षूणी व सर्वसामान्य स्त्रियां -

बौद्ध लेण्यास जसा राजघराण्यातील स्त्रियांनी अर्थसहाय्य केले त्याचप्रमाणे भिक्षूणी आणि सर्वसामान्य स्त्रियांनीही मोठ्या प्रमाणात दानधर्म केलेला आढळतो. समाजातील विविध स्तरातील, जातीतील स्त्रियांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता किंवा बौद्ध उपसिका किंवा बौद्धेतर स्त्रियांनीही स्तूप, विहार, त्यावरील अलंकारण्यासाठी निधी उपलब्ध केलेला आढळतो. बौद्ध भिक्षूणींना सोने किंवा राशीच्या स्वरुपात मिळालेला दान किंवा स्त्रियांचे स्त्रीधन या दानांसाठी वापरलेले आढळते. 'कुडा' येथील एक सबंध लेणे व जवळची पाण्याची टाकी परिव्राजिका पद्मिनिका हिने स्वखर्चाने कोरली होती. तिने आपल्या दोन शिष्यिणीसह हे टाक कोरल्याचा उल्लेख आहे. तिचा मामा भिक्षू असल्याने तीही भिक्षूणी झाली होती. कार्ला येथील १३व्या गुफांलेखात 'आषाढमित्रा' नामक भिक्षूणीने स्तंभासाठी देणगी दिली होती, हे स्पष्ट होते; तर १८व्या गुंफालेखानुसार चैत्यासाठी एका श्रमणाच्या मातेने देणगी दिल्याचा उल्लेख आहे. १९व्या गुंफालेखात धुणिकामाता कोडी तर २२व्या गुंफालेखात एका भदेताच्या शिष्येने विहार, चैत्यावरील वेदिकेसाठी केलेले दान कोरलेले आहे. कार्लाच्या चैत्य लेण्याच्या उत्तरेकडील एका विहारात अर्धचंद्राकृती टाक्यांच्या दोन बाजूवर बौद्ध भिक्षूच्या शिष्यिणीने श्राविका या आपल्या भगिनींच्या पुण्योपार्जनार्थ बौद्ध सन्याशांसाठी लेणे व पाण्याचे टाक दिलेले आढळतात. विहार लेण्याच्या दरवाजाच्या उजव्या बाजूस क्रमांक २च्या खोलीत वरच्या बाजूस बुद्धरक्षिता नावाच्या भिक्षूच्या मातेचा उल्लेख आहे. तिच्या सहाय्यामुळे अवुलामा येथे राहणाऱ्या सेतफरणीचा पुत्र सुवर्ष संघाचा अनुयायी उपासक हरफरण याने विहार लेणे दान केल्याचा उल्लेख आहे. वासिष्टिपुत्र पुळुमाविच्या कालखंडातील हा लेख आहे.

कान्हेरी लेणी, प्राचीन काळी जिचा 'कृष्णगिरी' म्हणून उललेख केला जात असे, त्यातील १०व्या गुंफालेखात धर्म खजिनदाराची शिवपालिता नावाच्या पत्नीच्या नावाने दान केल्याचे म्हटले तर २३व्या गुंफालेखात 'घोष' भिक्षूणीच्या 'पेणा कियसष्टा' नावाच्या शिष्येने गुंफा व जलकुंडासाठी दान दिले होते. ३९ नंबरच्या गुंफालेखात 'अपरांत' भागातील देशवासिनी 'दामिला' नावाच्या स्त्रीचा लेणी व जलककुंडासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. ३५ नंबरच्या गुंफालेखानुसार 'नंदनिका' मातेच्या स्मरणार्थ कोणी नगरवासियाने दान केले तर धेनुकाकट या ग्रामातील सर्पा नाम भिक्षूणीने गुंफा व जलकुंडासाठी दान दिले होते. ८१ नंबरचे लेणे हे 'केलियण' येथे राहणाऱ्या विष्णुनंदीचा पुत्र व व्यापारी असणाऱ्या एकाने माता-पिता, बहीण-भाऊ यांच्या नावे कोरले होते. त्यात मातेचा उल्लेख बोधिसमा असा केला आहे.

याशिवाय अमरावतीच्या स्तूपावरील शिलालेखातही 'इसिली' नावाच्या कुटुंबप्रमुखाने नाकानिका या पत्नीच्या नावाने दान दिल्याचे म्हटले. याशिवाय बेडसे येथील शिलालेखता नाशिकचा शेठचा मुलगा पुसनाक अपरदेवनाक याची पत्नी महाभोजाची कन्या महारथिनी महादेवी सामादिनिका हिने बौद्ध स्तूप दान केल्याचे म्हटले आहे.

याचाच अर्थ बौद्ध लेण्यांचा विकास, बौद्ध धर्माच्या प्रचार-प्रसाराचे कार्य सर्वसामान्य स्त्रियांकडून मोठ्या प्रमाणात आणि वर्षानुवर्षे घडत होते. सातवाहनकाल हा वैदिक धर्माच्या स्थिरतेचा होता. होम-हवन, यज्ञविधी मोठ्या प्रमाणात होत असत. चातुवर्ण्य अस्तित्वात होता. स्मृती, संहिता, हिंदूधर्म ग्रंथानुसार वर्णव्यवस्था व स्त्रीचे स्थान अधोरेखीत होते. तरीही इ.स.पू. ५०० शतकापासून सर्वसामान्यांना सामावून घेणारा

प्राकृत भाषेतून बौद्ध धर्म समाजाच्या सर्व वर्गात, वर्णात पोहचला व स्थिरावला. बुद्धकाळातील थेरींचे कार्य, पुढे भिक्षूणी संघाच्या निर्मितीस कारणीभूत ठरले व हा संघ अनेक वर्ष अनेक राजवटीत कार्यरत राहिला. सातवाहनांच्या चार-साडेचार शतकांच्या काळात बौद्ध धर्म लेण्यांच्या स्वरुपात वाढत राहिलाच परंतु साहित्याचे तसेच थोर नितीवान, बुद्धीवंत बौद्ध आचार्यांमुळे आदरणीय आणि स्वीकार्य ठरल्याचे स्पष्ट होते. अश्वघोष, नागार्जुन, आर्यदेव व कुमारील सारखे देदीप्यमान बौद्ध आचार्यांनी बौद्ध धर्माला तेजाळत ठेवले. 'सुऱ्हुलेख', 'माध्यमिककारिका', 'युक्तिशतिका', 'शून्यतासमाप्ती' वगैरे सारखे ग्रंथ, प्राकृत, तिबेटी, चिनी, संस्कृत वगैरे भाषेतील ग्रंथरचना सातवाहन काळात झालेली आढळते.

याचाच अर्थ वैदिक धर्माचे सातवाहन राजे बौद्ध धर्माला उत्तेजन देत होतेच, परंतु बौद्ध धर्मातील उच्च, उदात्त तत्त्वांचे काही प्रमाणात पालनही करीत होते. स्त्रियांचा सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग हा बौद्धसंस्कृतीचेच द्योतक होते. एकूणच राजघराण्यापासून सामान्य घरातील स्त्रियांचे बौद्ध लेण्यांच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान होते.

## निष्कर्ष –

१. सातवाहनराजे कला-संस्कृती-साहित्याचे भोक्ते होते तसेच धर्मसहिष्णू असल्याने बौद्ध, जैन धर्मास उत्तेजन, साहित्यास प्रोत्साहन दिले.
२. बौद्ध लेण्यांचे कार्य वर्षानुवर्ष, शतकानुशतके चालत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्याची गरज भासे. त्यामुळेच स्त्रियांचा सहभागही महत्त्वपूर्ण होता.
३. बौद्ध लेण्यात मोठ्या प्रमाणात शिलालेख लिहिलेले आढळतात. म्हणजेच ब्राह्मी लिपीचे आकलन व प्राकृत समाजमान्य भाषेतील व्यवहार सर्व थरातून होत असत. याचाच अर्थ समाज सुशिक्षित, सुसंस्कृत होता. लेखन-वाचन स्त्रियाही उत्तमप्रकारे करीत.
४. स्त्रियांवरील बंधने लक्षात घेता धर्माच्या बाबतीतील त्यांचे स्वातंत्र्य विशेष होते असे स्पष्ट होते. कारण द्वारपालिका असणारी स्त्रीही शिक्षित होती. हे गौतमी बलश्रीच्या लेखावरून स्पष्ट होते.
५. सातवाहन राजे उच्च अभिरूची संपन्न होते.

## संदर्भ –

१. डॉ. मिराशी वा. वि. – वाकाटक नृपती व त्यांचा काळ.
२. डॉ. शेषराम मेश्राम – 'थेरीगाथा' - साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९९३.
३. डॉ. मिराशी वा. वि. 'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख.
४. डॉ. राश्री बोरवंचिकर, सातवाहनकालीन महाराष्ट्र – प्रतिमा, पुणे १९९३.